# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.रातुमनावि/म.वि.वि./1465 -  दिनांक: ०१.१२.२०२०.

### :: परिपत्रक ::

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठ संचालीत व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि पदव्यूतर अभ्यासक्रमाकरीता प्रवेशासाठी इच्छूक संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सत्र २०२०–२१ या शैक्षणिक सत्राकरीता ज्या पदव्यूतर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाद्वारे केंद्रीय पध्दतीने करण्यात येत नाही. अशा सर्व पदव्यूतर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन केंद्रीय पध्दतीने विद्यापीठ स्तरावर दोन टप्प्यामध्ये राबविण्यात येत आहे.

ऑनलाईन केंद्रीय प्रवेश पध्दतीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाच्या दोन फेऱ्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाद्वारे करण्यात येणार आहे.

विद्यापीठाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रवेशाच्या फेऱ्या संपल्यानंतर अभ्यासक्रमनिहाय रिक्त जांगावर महाविद्यालयांना त्यांचे स्तरावर गुणवत्तेनुसार (Inter-Se-Merit) विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. परंतु सदर विद्यार्थ्यांचे विद्यापीठाद्वारे जाहिर करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीमध्ये नांव असणे आवश्यक राहील. हि प्रक्रिया पार पडल्यानंतर देखील जागा रिक्त राहिल्यास व विद्यापीठाद्वारे घोषीत गुणवत्ता यादीतील विद्यार्थी प्रवेशाकरीता उपलब्ध नसल्यास गुणवत्ता यादी व्यतिरीक्त विद्यार्थ्यांकडुन गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर प्रवेश देता येईल.

विद्यापीठाद्वारे प्रथम फेरीत व द्वितीय फेरीत ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र निर्गमित केलेले आहे. (Allotment Letter) अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या Web Protal वर Upload करण्यासाठी प्रत्येक विभाग/महाविद्यालयांना त्यांच्या Login ID मध्ये लिंक देण्यात आलेली आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश लिंक उघडुन विद्यार्थ्यांचा Control ID (प्रवेश अर्जावर नमुद केलेला/गुणवत्ता यादीमध्ये असलेला) टाकुन व त्या विद्यार्थ्यांचे सर्व मुळ प्रमाणपत्रे व पात्रता तपासुनच प्रवेश देण्यात यावे.

त्याचप्रकारे अल्पसंख्यांक कोटयातुन अल्पसंख्यांक महाविद्यालयाने महाविद्यालय स्तरावर केलेले प्रवेश त्याचप्रकारे बिगर अल्पसंख्यांक महाविद्यालयाने महाविद्यालय स्तरावर केलेले विद्यार्थ्यांचे प्रवेश Upload करण्याकरीता महाविद्यालयाच्या Login ID मध्ये "College Level Admission" म्हणुन लिंक देण्यात आलेली आहे. हया लिंकमध्ये प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेशाच्या शेवटच्या तारखेपर्यंत अपलोड करावे.

विभागात/महाविद्यालयांमध्ये झोलला प्रत्येक प्रवेश हा महाविद्यालयाच्या Login ID मध्ये Upload करण्यात यावा व झालेल्या सर्व प्रवेशाची यादी तीन प्रतीमध्ये प्रवेशाच्या अंतिम तारखेनंतर त्वरित विद्यापीठास सादर करण्यात यावी.

मा.प्र–कुलगुरु तथा सक्षम अधिकारी
हयांचे आदेशान्वये

(डॉ.रमण मदने)
उपकुलसचिव